**रे. दि. मु. क्रमांक १६९/२०२३ मधील नि. क्र. ३७ खालील आदेश.**
**कै. सदा सुभा कांबळे (म.वा.) श्रीरंग सदा कांबळे व स्वप्नील श्रीरंग कांबळे विरुध्द श्री अजय भागा कांबळे व इतर १**
**(आदेश पारित दिनांक ०१.०४.२०२४)**

---

सदरचा अर्ज वादी यांनी दाखल केला आहे. वादीनुसार, सदर दावा वाद मिळकत क्र. ८३७ मध्ये जे काही बांधकाम सुरु आहे, त्याबाबत मे. कोर्टास विनंती की, पुर्णतः बांधकामाचे स्थळपाहणी करुन योग्य अहवाल सादर करणे कामी विनंती अर्ज करित आहेत. तरी मे. कोर्टास वादी यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा व बांधकामास स्थळ पाहणी होत नाही तो पर्यंत स्थगिती देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल केलेले आहे की, वादीचे अर्जामध्ये स्थळ पाहणी करणेस व अहवाल सादर करणेस हरकत नाही. परंतु अहवालानंतर स्थगिती द्यावी अथवा नाही हे ठरविणेत यावी हि विनंती.

०८. सदरचा अर्ज, त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. सदरचा दावा हा अचल संपत्तीबाबत आहे. सदरच्या अर्जात स्थळपाहणी करुन योग्य अहवाल सादर करणेबाबतची विनंती केलेली आहे. प्रतिवादींनी सदरच्या अर्जास हरकत नाही असे कथन केलेले आहे परंतु प्रस्तुत दाव्यात आता स्थळ पाहणी करणे का आवश्यक आहे याबाबत अर्जात अवाक्षरही नमूद नाही. स्थळ पाहणीची गरज काय, स्थळपाहणी झाल्यावर अहवाल सादर झाल्यास दाव्यास त्या अहवालाचा काय परिणाम होणार किंवा अहवाल सादर न केल्यास त्याचा दाव्यावर काय परिणाम होणार याबाबतही अर्जात नमूद नाही. कोणताही अहवाल न्यायालयाकडून मागविण्यासाठी ते मागविणे का गरजेचे आहे, हे अर्जात नमूद असणे गरजेचे आहे परंतु सदर अर्जात केवळ येवढेच नमूद आहे की, दावा वाद मिळकत क्रमांक ८३७ मध्ये बांधकाम सुरु आहे. केवळ येवढया कथनाच्या आधारे सदरचा अर्ज मंजूर करता येणार नाही. न्यायालयाचा उपयोग हा न्यायालयाद्वारे अहवाल मागवून पुरावा गोळा करण्याकरिता करता येणार नाही. सबब, खालीलप्रमाणे

आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज निशाणी क्र. ३७ हा नामंजूर करण्यात येतो. |
| २. | सदर आदेशाची दोन्ही पक्षांनी नोंद घ्यावी. |
| ३. | खर्चाबाबत आदेश नाही. |

PATTEBAHADUR KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2024.04.05 10:54:29 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)

दिनांकः–  ०१.०४.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे–

न्यायालयाचे नाव  :  सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खंडाळा.

लघुलेखकाचे नाव :  सौ. एस.एस.शिंदे

Sd/–

(एस.एस.शिंदे)

लघुलेखक